# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

---

**दिनांक 18.09.2020 शुक्रवार**

**(गुन्हे)**

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मु.दा.का अन्वये 06 केसेस 08 आरोपींना अटक करून 14,01,740 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 05 केसेस 09 आरोपींना अटक करून 1,36,950 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा–या 00 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 380 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 1,29,350 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. हुडकेश्वर – चोरी :**

दिनांक 13.09.2020 चे 0600 वा ते 0900 वा दरम्यान अंदाजे 30 ते 35 वर्ष वयोगटातील एक अनोळखी आरोपी इसमाने पो.स्टे. हुडकेश्वर हद्दीत म्हाळगीनगर, सेलीब्रेशन हॉल, जवळील एस.बी. आय चे ए.टी.एम चे आत प्रवेश करून पाना व पेजकस चे साहायाने कॅश ड्राव्हर मधून नगदी 2,01,000 रू चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादी श्रीधर भाऊरावजी केदार, वय 39 वर्ष, रा. 145/ए, शिव नगर, हुडकेश्वर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे पोहवा राजकुमार वानखेडे, 9503330161 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. हुडकेश्वर, कळमणा – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

**अ) हुडकेश्वर** – दिनांक 16.09.2020 चे 2000 वा चे सुमारास पो.स्टे हुडकेश्वर हद्दीत राधाकृष्ण नगर, पिपळा फाटा, नागपूर येथे राहणा–या सौ. शामा सुरेश यादव, वय 30 वर्ष, यांचा मुलगा विशाल, वय 15 वर्ष, हा दुकानात जावून येतो असे सांगून गेला. परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आला नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. हुडकेश्वर येथे पोहवा राजकुमार वानखेडे, 9503330161 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**ब) कळमणा** – दिनांक 17.09.2020 चे 2230 वा ते दिनांक 18.09.2020 चे 0245 पो.स्टे कळमणा हद्दीत राहणारे फिर्यादी यांची 16 वर्षीय अल्पवयीन बहिण ही घरी कोणाला काही न सांगता निघुन गेली. परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. कळमणा येथे मपोउपनि खोब्रागडे, 8407926848 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. मानकापूर – प्राणांतीक अपघात :**

दिनांक 17.09.2020 चे 1650 वा चे सुमारास फिर्यादी अज्जु उर्फ नविन अवधेश सिंग ठाकुर, वय 33 वर्ष, रा. प्लॉट नं. 59, योगेंद्र नगर, नर्मदा सोसायटी, बोरगांव, नागपूर हे आपली चारचाकी फॉरच्युनर गाडी क्र. एमएच/46/झेड/9400 ही पो.स्टे. मानकापूर हद्दीत मानकापूर चौक, कल्पना टॉकीज, नागपूर येथे रेड सिंग्नलवर थांबले असता होंडा सिवीक चारचाकी क्र. एमएच/12/डी. वाय/9341 चा चालक हरनुर सिंग इंद्रपालसिंग भाटीया, वय 21 वर्ष, रा. देवरी, जि. गोंदीया याने

आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व हयगयीने चालवून फिर्यादीचे वाहनाला मागून धडक मारली त्यामुळे आरोपी हरनुर हा स्वतः गंभीर जखमी होवून स्वतःचे मरणास कारणीभुत झाला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. मानकापूर येथे सपोनि आय.एस हनवते. 8208228850 यांनी आरोपीविरूध्द कलम 279,337,338,304(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

5) पो.स्टे. अंबाझरी – खंडणी मागणा–या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल :

फिर्यादी सागर विजय देशमुख, वय 21 वर्ष, रा. प्लॉट नं. 180, एल.आय.टी रोड, शिव मंदीर, राम नगर, नागपूर यांचा किराणा दुकानाचा व्यवसाय असून त्यांना व्यवसायाकरीता पैशाची अत्यंत गरज असल्याने त्यांनी दिनांक ऑक्टोबर 2019 ते 11.09.2020 चे 2230 वा चे दरम्यान पो.स्टे. अंबाझरी हद्दीत पांढराबोडी पोलीस चौकीचे मागे, संजय कंस्ट्रक्शन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स नावाचे सावकाराचे कार्यालय, नागपूर येथे राहणारे आरोपी क्र. 1) संजय रामुजी फातोडे, वय 46 वर्ष, 2) रजत संजय फातोडे, वय 22 वर्ष, यांचे कडे जावून व्याजाने 15,000 रू घेतले. आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे आर्थीक अडचणींचा फायदा घेवून 15,000 रू कर्ज अवास्तव बेकायदेशीर व्याज दराने फिर्यादीस देवून त्याकरीता को–या पेपर वर सही व आधार कार्ड झेरॉक्स प्रत व दोन फोटो घेवून पावती बुकवर स्वाक्षरी घेवून अधिक पेनॉल्टी लावून फिर्यादीकडून 20,000 रू जबरदस्तीने वसुल केले. आरोपी क्र. 3) प्रफुल्ल उर्फ दादु गायकवाड वय 22 वर्ष, व त्याचा एक मित्र यांनी वसुली साठी फिर्यादीस वारंवार अश्लिल शिवीगाळ करून व जिवे ठार मारण्याची धमकी देवून पैसे जबरदस्तीने वसुल केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. अंबाझरी येथे सपोनि ए.एस कपुर, यांनी आरोपीविरूध्द कलम 384,386,294,506(ब),34 भादंवि सहकलम 43,44,45,46 महाराष्ट्र सावकारी अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

6) पो.स्टे. बेलतरोडी – फसवणुक :

पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत प्लॉट नं 17 जननी मिलींद सोसायटी न्युलुक कॉन्वेंट जवळ नरेंद्र नगर नागपुर येथे राहणा–या फिर्यादी डॉ स्मृती गुणा शेखर वय 28 वर्ष यांनी आपले घरातील सदस्यांकरिता ॲमेझॉन वेब साईटवर ट्रेडमील धावण्याची मशिन सर्च करून ती खरेदी करण्याकरिता ऑर्डर साईटमध्ये पाठविली होती त्यानंतर दिनांक 12.09.2020 चे 1000 वा ते 1100 वा चे दरम्यान यातील आरोपी ॲमेझॉन. प्रमोशन डिपार्टमेंटची अज्ञात तोतया जया नावाची मुलगी आणि अमेझॉन कंपनीचा तोतया ॲक्झेक्युटिव्ह अज्ञात इसम ने आपले आर्थिक फायदयाकरिता लबाडीचे इरादयाने आपसांत संगणमत करून फिर्यादीला मो नं 9073458260 8335996735 या वरून कॉल करून ॲमेझॉन कंपनीतुन बोलत असुन ॲमेझॉन मोठा प्रमोशन या स्कीममधील 5 लकी कस्टमर पैकी एक कस्टमर असल्याचे सांगुन फिर्यादीला फ्रिज, टिव्ही, एसी, यांच्या ॲपल कंपनी मोबाईल फोन यापैकी एक फ्री गिफ्ट करिता ॲमेझॉन स्कीमचा सन ॲन्ड .कंडीशन प्रमाणे वस्तु खरेदी करण्यास सांगितले परंतु फिर्यादी जवळ अगोदर अमेझॉन वेब साईट वर ट्रेडमिल मशिन पार्टमध्ये सिलेक्शन करून ठेवल्याने त्या मशिनचे 29,999 रू ॲमेझॉन प्रो पीवायसीएमओ 1,2,3,4,5,6 चा सेलविक्री पेटीएम अकाउंटवर ऑनलाईन ट्रांसफर करण्यास लावुन फिर्यादीला कोणतीही वस्तु न पाठविता त्यांची फसवणुक केली आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे सपोउपनि विरेंद्र 8888803960 यांनी आरोपींविरूध्द कलम 419,420 भादंवि सहकलम 66(डी) माहीती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(अकस्मात मृत्यु)

पो.स्टे. वाडी, हुडकेश्वर, वाठोडा, नंदनवन, इमामवाडा, वाडी :

1) वाडी – दिनांक 28.08.2020 चे 1700 वा चे सुमारास पो.स्टे. वाडी हद्दीत साई नगर, नागपूर येथे राहणारे प्रवीण प्रभुदास खरात, वय 43 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यसान दिनांक 16.09.2020 चे 1700 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाडी येथे पोउपनि के.एन. लाकडे, 7721987525 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) हुडकेश्वर – दिनांक 16.09.2020 चे 1900 वा ते 17.09.2020 चे 1600 वा चे दरम्यान पो.स्टे. हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. 561, न्यु सुभेदार नागपूर येथे राहणारे सचीन गणपती पराते, वय 36 वर्ष, यानी आपल्या राहते घरी बेडरूममध्ये सिलींग फॅनला दुपट्टयाचे सहायाने गळफास लावून आत्महत्या

केली. याप्रकरणी फिर्यादी गणपती सिधबाजी पराते, वय 75 वर्ष, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे पोहवा राजकुमार यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

3) वाठोडा – दिनांक 17.09.2020 चे 0600 वा चे सुमारास नागोराव जगन्नाथ फुंड, वय 63 वर्ष, रा. प्लॉट नं. 41, चकोले वाडी, जिजामाता ले आऊट, खरबी, नागपूर यांचे प्रेत पो.स्टे. वाठोडा हद्यीत चकोले वाडी, चकोले यांचे शेतातील विहीरीच्या पाण्यात तरंगतांना मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी गजानन नागोराव फुंड, वय 28 वर्ष, यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाठोडा येथे पोहवा राजेश नासरे, 7020757326 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

4) नंदनवन – दिनांक 13.09.2020 चे 1843 वा चे सुमारास पोस्टे नंदनवन हद्यीत गल्ली नं. 4, राजेद्र नगर झोपडपट्टी, नागपूर येथे राहणारे पुसन दिगांबर शेंडे, वय 53 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 17.09.2020 चे 1800 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पोस्टे नंदनवन येथे पोउपनि भवाळ, 9922995726 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

5) इमामवाडा – दिनांक 17.09.2020 चे 1830 वा चे सुमारास पोस्टे इमामवाडा हद्यीत 247, चंदन नगर नागपूर येथे राहणा–या जयाबाई अशोक कांबळे, वय 58 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पोस्टे इमामवाडा येथे सपोनि मुढे, 0712–2743088 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे

6) वाडी – दिनांक 17.09.2020 चे 1900 वा चे सुमारास पोस्टे वाडी हद्यीत साई मंगल कार्यालय मागे नागपूर येथे राहणारे पोहवा परमानंद पांडुरंग राघोसे वय 55 वर्ष (नेमणुक – एमआयडीसी झोन वाहतुक विभाग ) यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पोस्टे वाडी येथे पोउपनि जायभाये, 9767036237 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर